
डॉ. सचिन महाजन


श्वेता गोसावी


डॉ. सखाराम आघाव

# सोयाबीनवरील तांबेरा, करपा, मोझॅकची लक्षणे

सध्या बहुतांश ठिकाणी पावसामुळे जमिनीत अतिरिक्त प्रमाणात पाणी साठलेले आहे. वातावरणात आर्द्रता आहे. अशा परिस्थितीमध्ये सोयाबीनवर विविध रोगांचा प्रादुर्भाव दिसतो. या रोगांची लक्षणे ओळखून तातडीने उपाययोजना कराव्यात.



## तांबेरा

- सततचा पाऊस, ढगाळ हवामान रोगाच्या वाढीस अनुकूल. वाऱ्यामार्फत तांबेरा रोगाचे बिजाणू पसरतात.
- शेंगा भरण्याच्या अवस्थेत जास्त प्रादुर्भाव. जमिनीलगतच्या पानांवर प्रादुर्भाव आढळून येतो. बाधित पाने पिवळी पडतात.
- मुख्य शिरेजवळ लहान आकाराचे पिवळसर तांबूस रंगाचे ठिपके जास्त प्रमाणात दिसतात. तीव्रता वाढली की मातकट रंगाचे डाग पानाच्या दोन्ही बाजूस तसेच देठ, कोवळे खोड, फांद्यांवर दिसतात. छोटे ठिपक्यामध्ये तांबूस तपकिरी रंगाची पावडर तयार होते.
- अकाली पानगळ होते. त्यामुळे शेंगेत दाणे भरले जात नाहीत अथवा बारीक, रोगट व सुरकुतलेले दाणे तयार होतात.

### नियंत्रण

- जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

फवारणी : प्रति लिटर पाणी

- प्रोपीकोनॅझोल (२५ टक्के ईसी) १ मिलि किंवा
- हेक्झाकोनॅझोल (५ टक्के ईसी) १ मिलि किंवा
- अझॉक्सीस्ट्रॉबिन (१८.२) टक्के अधिक डायफेनोकोनॅझोल (११.४ टक्के एससी) संयुक्त बुरशीनाशक १ मिलि

## शेंगेवरील करपा (पॉड ब्लाइट)

- आर्द्र व दमट हवामानात शेंगा भरण्याच्या अवस्थेत प्रादुर्भाव दिसतो.
- अनियमित आकाराचे, मोठे होत जाणारे गडद तपकिरी ठिपके खोड आणि शेंगांवर तयार होतात.
- शेंगा पिवळ्या पडतात, वाळतात. कोवळ्या शेंगांवर प्रादुर्भाव झाल्यास दाणे भरत नाहीत.
- बाधित शेंगेतील बी रोगट, काळपट, वजनाने हलके होऊन उगवण क्षमता नष्ट होते.

### नियंत्रण

फवारणी : प्रति लिटर पाणी

- टेब्युकोनॅझोल (२५.९ टक्के ईसी) १.२५ मिलि किंवा
- पायरॅक्लोस्ट्रॉबीन (२० टक्के डब्लूजी) १ ग्रॅम किंवा
- टेब्युकोनॅझोल(१० टक्के) अधिक सल्फर (६५ टक्के डब्लूजी) संयुक्त बुरशीनाशक २.५ ग्रॅम



## कॉलर रॉट (बुंधा सड)

- जमिनीत अतिरिक्त पाणी जास्त काळ साठून राहिल्यास प्रादुर्भाव दिसतो.
- जमिनीलगत झाडाच्या खोडावर पांढऱ्या रंगाची बुरशी वाढते. या ठिकाणी खोड ओलसर होऊन खोडाची साल सडते. सडलेल्या भागावर बुरशीची मोहरीसारखी बीजाणूफळे तयार होतात.
- झाड पिवळे पडून सुकते.

### नियंत्रण

- जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.
- रोगट झाडे उपटून जाळून नष्ट करावीत किंवा प्लॅस्टिकच्या पोत्यात भरून शेताच्या बाहेर खड्ड्यात पुरून टाकावीत. कारण रोगकारक बुरशी अवशेषांच्या आश्रयाने जीवंत राहून प्रसारास कारणीभूत ठरते.
- १० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हिरीडी प्रति लिटर पाण्यात मिसळून मुळाजवळ आळवणी करावी.



## कोरडी मूळ व खोड सड (चारकोल रॉट)

- ज्या भागात कमी पाऊसमान आहे त्या भागात प्रादुर्भाव दिसून येतो.
- जमिनीलगतच्या खोडावर व मुळांवर काळपट डाग.
- मूळ, खोडाची साल सडल्यामुळे अन्न पुरवठा होत नाही. परिणामी पाने पिवळी पडतात, रोपे सुकतात.

### नियंत्रण

- रोगट झाडे उपटून जाळून नष्ट करावीत.

## पिवळा मोझॅक

- रोपावस्थेपासून पीक पक्वतेच्या कालावधीत प्रादुर्भाव दिसतो.
- विषाणूचा प्रसार पांढरी माशीद्वारे होतो.
- पानांवर हिरवे, पिवळे अनियमित चट्टे दिसतात. पाने पिवळी दिसतात. शेंड्याकडील पाने पिवळी पडून आकाराने लहान होतात.
- झाडाची वाढ खुंटते, फुले व शेंगांची संख्या घटते.

### नियंत्रण

- रोगग्रस्त झाडे उपटून जाळून नष्ट करावीत.
- बांधावरील तणे, पूरक वनस्पतींचा नाश करावा.
- पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे (हेक्टरी २५ ते ३०) लावावेत.



पांढऱ्या माशीचे नियंत्रण : प्रति लिटर पाणी

- डायफेन्थ्यूरॉन (४७.८ टक्के एससी) १ मिलि किंवा
- ॲसिटामिप्रिड (२५ टक्के) अधिक बायफेनथ्रीन (२५ टक्के डब्ल्यूजी) संयुक्त कीटकनाशक ०.५ ग्रॅम किंवा
- पायरीप्रॉक्सिफेन (१० टक्के)अधिक बायफेनथ्रीन (१० टक्के ईसी) संयुक्त कीटकनाशक २ मिलि



बुरशीजन्य ठिपके


## पानांवरील बुरशीजन्य ठिपके

- आर्द्र, दमट हवामान रोगास पोषक. प्रसार बियाणे, रोगट अवशेष आणि हवेमार्फत होतो.
- फुलोरा अवस्थेनंतर रोगाचा प्रादुर्भाव दिसतो. पान, खोड आणि शेंगांवर तपकिरी- करड्या रंगाचे, गोलाकार अथवा विविध आकाराचे, पिवळे वलय असणारे ठिपके दिसतात.
- ठिपक्याचा मध्यभाग गळून जातो, पानांवर छिद्रे दिसून येतात. ठिपके आकाराने वाढत जाऊन एकमेकांत मिसळतात. पानाचा भाग करपलेला दिसतो.
- पानातील कर्बग्रहण क्रिया मंदावते, शेंगांचे पोषण व्यवस्थित होत नाही.

### नियंत्रण

फवारणी : प्रति लिटर पाणी

- टेब्युकोनॅझोल (३८.३९ टक्के एससी) १.२५ मिलि किंवा
- अझॉक्सिस्ट्रॉबीन (१८.२ टक्के)अधिक डायफेनोकोनॅझोल (११.४ टक्के एससी) संयुक्त बुरशीनाशक १ मिलि किंवा
- अझॉक्सिस्ट्रॉबिन (८.३ टक्के) अधिक मॅन्कोझेब (६६.७ टक्के डब्लूजी) संयुक्त बुरशीनाशक ३ ग्रॅम



बुरशीजन्य ठिपके

- डॉ. सचिन महाजन ९४२११२८३३३ (सहायक प्राध्यापक, वनस्पती रोगशास्त्र, कृषी संशोधन केंद्र,कसबे डिग्रज, जि. सांगली)